महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या पहिल्या दोन पाल्यांना "मुलभूत वस्तू संच सहाय्य योजना" या योजनेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक: इबांका-१०२६/प्र.क्र.१४५/काम-७

मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२६

वाचा-

१. केंद्र शासनामार्फत निर्गमित सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० दिनांक २१.११.२०२५
२. सामाजिक सुरक्षा संहिता (केंद्रीय) नियम, २०२६ दिनांक ०८.०५.२०२६
३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ बैठकीतील ठराव क्र.६५ (१-११)/२०२६, दिनांक १२.०५.२०२६
४. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.१२३४/२०२६/कायदा-२०२६/प्र.क्र.१३/मंडळ-०१, दिनांक १९.०५.२०२६
५. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र.इबांका-०५२६/प्र.क्र.७१ (III)/काम-७, दि.१३.०७.२०२६
६. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.१७१७/२०२६/शैसंच-२०२६/प्र.क्र.०१/योजना-१६, दिनांक २०.०७.२०२६
७. शासन पत्र क्र.इबांका-०७२६/प्र.क्र.१०९/कामगार-७, दिनांक २१.०७.२०२६
८. वस्तू निवड समितीच्या दि.२७.०७.२०२६ व दि.०३.०८.२०२६ रोजी पार पडलेल्या बैठकांचे इतिवृत्त.
९. मंडळ बैठक दि.११.०८.२०२६ ठराव क्र.६६(७)/२०२६.
१०. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.२०५८/२०२६/शैसंच-२०२६/प्र.क्र.०१/योजना-१६,दि.२७.०८.२०२६.

प्रस्तावना :-

केंद्र शासनामार्फत संपूर्ण देशात दिनांक २१.११.२०२५ पासून २९ कामगार कायदे निरसित करुन त्याबाबत आता चार नवीन कामगार संहितांची (Labour Codes) अंमलबजावणी सुरु केली. त्यानुसार आता इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणाशी संबंधित बाबींचा समावेश "सामाजिक सुरक्षा संहिता-२०२०" मध्ये करण्यात आला आहे.

२. सदर संहितेच्या कलम (७) (६) मध्ये बांधकाम कामगारांना कोणत्या बाबींकरीता विविध कल्याणकारी योजना राबविणे आवश्यक आहे, याबाबतच्या तरतूदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. यानुसार कलम (७) (६) (d) मध्ये *"frame educational schemes for the benefit of children of the beneficiaries as may be prescribed by the appropriate Government"* अशी तरतूद नमूद केली आहे.

३.	या तरतुदीस अनुसरुन संदर्भाधीन क्र. ३ अन्वये मंडळाने केलेला ठराव आणि त्यास अनुसरुन मंडळामार्फत शासनास प्राप्त संदर्भिय क्र.४ येथील प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भिय क्र.५ अन्वये मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्यांना "शैक्षणिक सहाय्य योजना" लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. सदर शासन निर्णयातील "प्रपत्र-अ" मधील अनुक्रमांक ७ मध्ये मुलभूत वस्तू संच सहाय्य योजनेचे पात्रता निकष, वित्तीय सहाय्य व आवश्यक कागदपत्रे नमूद केली आहेत. त्यास अनुसरुन मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता मुलभूत संच (Basic Item Kit) योजनेअंतर्गत वितरीत करावयाच्या मुलभूत संचात कोणकोणत्या उपयुक्त वस्तुंचा समावेश असावा, याबाबत मंडळामार्फत संदर्भिय क्र.६ येथील प्राप्त पत्रास अनुसरुन संदर्भिय क्र.७ येथील पत्रान्वये सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाच्या वस्तु निवड समिति गठीत करण्यात आली होती.

४.	सदर वस्तु निवड समितीच्या संदर्भिय क्र. ८ येथील नमूद दोन्ही इतिवृत्तानुसार निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत देण्यात येणाऱ्या ३४ वस्तू संचाचा व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २३ वस्तूंचा अभ्यास करून अंतिम २२ वस्तूंचा संच निश्चित करुन त्यास मंडळाने संदर्भिय क्र.९ येथील ठराव क्र.६६(७)/२०२६ अन्वये मान्यता देऊन सदरहू प्रस्ताव मंडळाने शासन मान्यतेस्तव संदर्भिय क्र.१० येथील पत्रान्वये सादर केला.

त्यानुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता लागू केलेल्या सुधारित "शैक्षणिक सहाय्य योजना" अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवी मध्ये शिक्षण घेत असलेल्या नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांना "मुलभूत वस्तू संच सहाय्य योजना" या योजनेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांच्या इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या पहिल्या दोन पाल्यांना "मुलभूत वस्तू संच सहाय्य योजना" या योजनेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे.

२.	याकरीता गठीत वस्तु निवड समितीचा अहवाल व त्यावर मंडळाने दिनांक ११.०८.२०२६ रोजी बैठकीत केलेल्या ठरावामधील शिफारशीनुसार "मुलभूत वस्तू संच सहाय्य योजना" या योजनेअंतर्गत मंडळामार्फत वितरीत करावयाच्या मुलभूत वस्तु संचामध्ये खालील २२ वस्तूंचा समावेश करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

अ.क्र.	मुलभूत संचातील वस्तू	नग
१	पाण्याची बाटली	०१
२	थंड/गरम पाण्याचे थर्मास	०१
३	टिफीन बॉक्स	०१
४	छत्री	०१
५	रेनकोट	०१
६	परीक्षासाठीचे पॅड	०१
७	लॉंग बुक	१८
८	ड्रॉईंग बुक	०८
९	बॉल पेन बॉक्स	०१
१०	पेन्सील बॉक्स	०२
११	भूमितीचा कंपास	०१

१२	ऑईल पेस्टल्स	०२
१३	पोस्टर कलर	०१
१४	ब्रश संच	०१
१५	प्लॅस्टीक पट्टी	०२
१६	सोलर लॅम्प	०१
१७	कॅलक्युलेटर	०१
१८	फोल्डींग अभ्यास टेबल	०१
१९	व्हाईट बोर्ड (२ मार्कर सहीत)	०१
२०	गजराचे घडयाळ	०१
२१	शाळेची बॅग	०१
२२	किट बॅग	०१
एकुण नग		**४९**

३. उक्त मुलभूत वस्तू संच सहाय्य योजनेसाठी येणारा खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीमधून भागविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. सदरहू प्रक्रिया राबविण्यास सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०३०१७०९४९१३५४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=856B31C793B12E4F22CB247C5CFF7F3358867F2482AA2234F6131BF8940DBD2E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2026.10.30 17:11:34 +05'30'

(दिपक पोकळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन, मुंबई
२. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा , विधानमंडळ, मुंबई
३. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा आणि अल्पसंख्याक विकास विभाग), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. सर्व मा. विधानपरिषद सदस्य
१२. सर्व मा. विधानसभा सदस्य
१३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन, मुंबई
१४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. अपर मुख्य सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मुंबई.

१६. सचिव/प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई

१७. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य

१८. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

१९. निवड नस्ती (कामगार-७)